**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

(सेंट्रल प्रोव्हिंसेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**महाविद्यालय विकास विभाग**

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॉम्पस चौक ते अंबाझरी टी-पॉईंट मार्ग, नागपुर - ४४००३३

दुरध्वनी क्रमांक: ०७१२-२५२९९३२ फॅक्स नं: ०७१२-२५५५७०१, E-mail ID: infoarcollege@ymail.com


**क्र.म.वि./२५५** **दिनांक : 15-06-2023**

प्रती,

प्राचार्य,
**रूखमा महिला महाविद्यालय**
ठिकाण - नवेगांव बांध ता.- अर्जुनी मोरगाव , जि.- गोंदिया - 441702

**विषय :-** आपले महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचे प्रथम वर्षाचे प्रवेश सत्र २०२३-२४ करिता गोठविण्याबाबत.

**संदर्भ :-** आपला सत्र २०२३-२४ करिता निरंतर संलग्निकरण काळ वाढविण्याकरिता शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षणासाठी प्राप्त प्रस्ताव.

महोदय/महोदया,

आपले उपरोक्त संदर्भीय प्रस्तावाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात सुरू असलेल्या **बॅचलर ऑफ सायन्स (होम सायन्स)** या अभ्यासक्रमांच्या निरंतर संलग्निकरण काळ सत्र २०२३-२४ साठी वाढविण्याकरिता आपण सादर केलेल्या प्रस्तावावर विद्यापिठाद्वारे गठीत शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार आपले महाविद्यालयास ५०% पेक्षा कमी गुण प्राप्त होत असल्याने निर्देश क्र. १२/२०२३ मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता मडंळाद्वारे आपले महाविद्यालयातील **बॅचलर ऑफ सायन्स (होम सायन्स)** या अभ्यासक्रमांना सत्र २०२३-२४ करिता संलग्निकरण न देण्याची शिफारस विद्या परिषदेला केली होती. सदर शिफारशीस मा. कुलगुरूंनी विद्वत परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत मान्यता प्रदान करून आपले महाविद्यालयातील **बॅचलर ऑफ सायन्स (होम सायन्स)** या अभ्यासक्रमांचे सत्र २०२३-२४ मधील प्रथम वर्षाचे प्रवेश गोठविण्यास मान्यता प्रदान केली आहे.

त्या अनुषंगाने आपणास सुचविण्यात येते की, सत्र **२०२३-२४** करिता आपल्या महाविद्यालयातील **बॅचलर ऑफ सायन्स (होम सायन्स)** या अभ्यासक्रमांचे प्रवेश गोठविण्यात आले असल्याने सदर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात सत्र २०२३-२४ करिता विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये, विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

( डॉ.रमण मदने )
उपकुलसचिव
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ,नागपूर

प्रतिलिपी माहितीकरिता :

१. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. उपकुलसचिव (परीक्षा पुर्व)
३. स.कु.स.(सामान्य परीक्षा विभाग)
४. स.कु.स. (परीक्षा व चौकशी)
५. स.कु.स.(गोपनीय विभाग)

**यांना विनंती आहे की त्यांनी उपरोक्त महाविद्यालयाचे नामांकन अर्ज व प्रथम वर्षाचे परीक्षा अर्ज सत्र २०२३-२४ साठी व पुढील आदेशापर्यंत स्वीकारू नयेत.**